म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७७८

# घोषणा

[ निरोप व गीतें आणि चैतन्य गाथा यांतलि थोडासा भाग ]

लेखकः-पां. म. बापट

१९५०२.
REFBK-0019502
REFBK-0019502

त एक आणा.

# १ मराठे

मराठे अम्हीं श्रीशिवाजी प्रभूचे ।
अम्हीं पांग फेडूंच ह्या आर्यभूचे ॥
असे पंगु कां आमुची राष्ट्र—माता ।
अम्हीं जाणतों वर्म हें पूर्ण आतां ॥ १ ॥

अम्हीं जाणूनी वर्म सत्याग्रहांत ।
उडी घेतसों पाहूनी धर्मघात ॥
अम्हीं पांडवांसारिखी शिस्त पाळूं ।
मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं ॥ २ ॥

खरे कर्मयोगी वयातीत थोर
खरे कर्मयोगी वयें अल्प थोर
खरे कर्मयोगी कुणीही चला
महाराष्ट्रतेजस्विता जागवाया ॥ ३ ॥

महाराष्ट्रतेजस्विता नाहीं मेली ।
महाराष्ट्रतेजस्विता ही निजेली ।
महाराष्ट्रतेजस्विता जागवाया ।
चला या चला बंधुनों या चला या ॥ ४ ॥

महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें ।

REFBK-00195
REFBK-0

मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले ।
खरा वीर वैरी पराधीनतेचा ।
महाराष्ट्र आधार या भारताचा ॥ ५ ॥

---

## २ हरीची हांक.

झुरे धर्म; सत्ता अधर्मासि आली ।
नुरे सज्जनां दुर्बलां कोणि वाली ।
अधर्मे जनीं मांडिलें घोर कर्म ।
हरीला नको जाहला हा अधर्म ॥१॥
हरी हा स्वयें होतसे मत्स्य, कूर्म ।
विनाशावया घोरकर्मी अधर्म ।
कधीं हा नरां वानरां सानथोरा ।
करूनी पुढें आवरी भूमिभारा ॥२॥
सवें वानरां घेइ रामावतारीं ।
सवें गोप जो घेइ कृष्णावतारीं ।
जयें प्रेरिलें मावळ्यांला शिवाला ।
स्वयें हांक दे श्रीहरी तो तुम्हांला ॥३॥
हरी हा तुम्हांला स्वयें हाक देई ।
मनीं कान द्या आयका सर्व भाई ।

हरी हा उभा भारतक्षेत्रिं आज ।
करायासि कांहीं नवें धर्मकाज ॥४॥
धनानें कुणी वैश्य उन्मत्त झाला ।
कुणी भूप सत्तामदें अंध झाला ।
इहीं या जनीं मांडिलें घोर कर्म ।
हरिला नको जाहला हा अधर्म ॥५॥
असे वैश्यधर्म, असे राजधर्म ।
असे आजही बुद्धिमंतासि धर्म ।
विचारा विचारी नव्या पंडिताला ।
अधर्मीं नका बूडवूं हो स्वतांला ॥६॥
विचारा नव्या पंडिता गौरकाया ।
विचारा नव्या पंडिता गौरबाह्या ।
विचारा कुणाही खऱ्या पंडिताला ।
अधर्मीं नका बूडवूं हो स्वतांला ॥७॥
धनें वैश्य भूपाल सत्तामदानें ।
जसे जाहले अंध पूर्वी शहाणे ।
तसे आजही शाहणे अंध झाले ।
भल्यां दुर्बलांसी छळाया निघाले ॥८॥
भल्यां दुर्बलां संकटीं हात द्यावा ।
बली दुर्जनांचा परामर्श घ्यावा ।

नरां वानरां ठेवूनी चाकरीला ।
असे सत्य हें वेड माझ्या हरीला ॥९॥
तुम्हीं चाकरी चालवीली स्वतांची ।
तुम्हीं चाकरी चालवीली गृहाची ।
बरी ती; परी शांति अभ्यंतरींची ।
खरी एक दे चाकरी श्रीहरीची ॥१०॥
म्हणूनी तुम्हां सर्व लोकांसि याची ।
धरा चाकरी श्रीहरीची सदाची ।
करा सत्यसेवा, करा न्यायसेवा ।
हरी सेवकां देतसे शांतिठेवा ॥११॥

---

## ३ संसाराचें सार.

(अभंग.)

सार संसाराचें, पर-उपकार,
त्याविण असार सर्व कांहीं ।
देहा कष्ट होतां, देह रडे रडो ।
उपकार घडो, निश्चयो हा ।
मना कष्ट होतां, मन रडे रडो,

उपकार घडो, निश्चयो हा ॥
देह दिला देवें, उपकारासाठीं,
उपकारासाठीं दिलें मन ॥
अल्प शक्ति तरी, अल्प उपकार,
थोर तरी थोर करणेंचि ॥
उपकारीं वेंचा, तन मन धन,
मोक्षासी साधन, दुजें नाहीं ॥ १ ॥

---

## ४ देशाचा संसार

( अभंग )

देशाचा संसार, माझे अंगावरी,
ऐसें थोडें तरी, वाटूं द्याहो ॥
वाटूं द्याहो थोडें-तरी प्रत्येकासी
माझी कासाविसी, याचसाठीं ॥
याचसाठीं तुम्हां, हात जोडीतसें
कोणी म्हणतसे, वेडा झाला ॥
वेडा झाला देश-माउलीचे साठीं
होतें पुण्य गांठीं, हेंचि खरें ॥

होंचि खरें देवा, आवडता झालों,
तेणें निवडिलों देशसेवे ॥
देशसेवेसाठीं, व्हावेत सगळे,
ज्यांना ज्यांना कळे, धर्मतत्त्व ॥
धर्मतत्त्व तेंचि, जो कां उपकार,
त्याचाचि आधार, सज्जनासी ॥
सज्जनासी चहूं-कडूनि टोंचिती,
कितीक छळिती, छळक ते.
छळक ते अंतीं, मनीं पस्तावती,
सज्जनाची शांति, देखोनिया ॥
देखोनियां शांति, कारण शोधीती
तेथ आलोकिती भूतदया ॥
भूतदया बीज, उपकार फळ,
शांति ते अढळ, उपकारीं ॥
उपकारीं ज्यांना, सार्थकता वाटे
सोशिती चपेटे, संकटाचे ॥
संकटाचे काळीं, हृदय निवासी
आपुल्या भक्तासी, धीर देई ॥
धीर देई कीं जो, पर-उपकार,

तोचि तो साचार, धर्मतत्त्व ॥
धर्मतत्त्व ज्यांनीं, आपुलेंसें केलें,
त्यांसी बोलाविलें, देशसेवे ॥
देशसेवेसाठीं, राबावें कांहींसें,
हेंचि मज पिसें, सत्य सत्य ॥
सत्य सत्य माझी, विद्याशक्ति थोडी,
परी देवा गोडी, भक्तीचीच ॥
भक्तीचीच गोडी, सुदाम्याचे पोहे
गोड करिताहे, हरिमुखीं ॥
हरिमुखीं मीही, घालितसें पोहे
मूठभरी तो हे, स्वीकारीत ॥
स्वीकारीत भावें, केली देशसेवा
मज शांतिमेवा, वाढीतसे ॥
वाढीतसे हरि, भोक्षाचे वाढणें
ज्यासी ज्यासी येणें, त्याणें यावें ॥
यावें यावें ऐशी, हांक दे लोकांसी
ऐसें मजपाशी, हरि बोले ॥
हरि बोले मी तों बोलावणें करी,

तुम्हासी पाचारी, हरिसाठीं ॥
हरीसाठीं तुम्हां, बोलावणें केलें
आले वा न आले, मज काय ॥
मज काय मी तों, सेवक हरीचा,
वेडा पिसा त्याचा, त्यासी गोड ॥
त्यासी गोड व्हाल, जेणें तें तुम्हांसी,
गूढ सज्जनांसी, सांगितलें ॥
सांगितलें कीं त्या, सेवा-अनुरक्त,
आवडतो भक्त स्वदेशाचा ॥
देशाचा संसार, माझे अंगावरी,
ऐसें थोडें तरी, वाटूं द्याहो ॥

---

# ५ आयुष्याचा नाश.

## ( अभंग )

देशाची व्यवस्था देशी जनां हातीं ।
शासनाची रीति हेचि बरी ॥
बरी दुज्या सर्व रीतींहुनी फार ।
अनुभवें सार कळलें हें ॥

कळलें हें सार सान थोरां येथें ।
इंग्रजांचें नातें कामा आलें ॥
कामा आलें, आतां पुढें काय मार्ग ।
स्वराज्याचा स्वर्ग लाभे कैसा ॥
कैसा देश–पाश शिथिल होईल ।
केव्हां ती येईल सत्ता हातीं ॥
हातीं सत्ता सर्व देशाची पाहिजे ।
त्यावीण हें ओझें नर–जन्म ॥
नर–जन्म ओझें स्वराज्या वांचून ।
ऐसें मनांतून वाटे कोणा ? ॥
कोणा वाटे त्यासी माझा उपदेश ।
नका करूं नाश आयुष्याचा ॥
आयुष्याचा नाश भिकेची शिष्टाई ।
नका ठाईं ठाईं दीन होऊं ॥
होऊं नका दीन देवाचेही पुढें ।
दैन्यानें न जोडे कृपा त्याची ॥
त्याची कृपा होई समर्थाच्या वरी ।
देवाची ही परी सुप्रसिद्ध ॥

सुप्रसिद्ध गोष्ट धरूनी ही ध्यानीं ।
वागती या जनीं तेचि थोर ॥
थोरपण नव्हे भिकाऱ्याचें धन ।
जिवाचें या रान करणें लागें ॥
लागे स्वाहाकार सदेह मनाचा ।
उद्धार देशाचा जरी व्हावा ॥
जरी व्हावा स्वर्ग, स्वराज्याचा तरी ।
भिकेची खापरी फोडा फोडा ॥
फोडा ही खापरी टाका हाय हाय ।
कोणाचेही पाय धरूं नका ॥
नका नका धरूं दुज्याचा विश्वास ।
स्वामी रामदास काय सांगे ॥
सांगे कार्य भाग बुडे या विश्वासें ॥
कष्टें मना ऐसें सर्व होय ॥
होय सर्व कांहीं सामर्थ्याचे पायीं ॥
सामर्थ्य तें होई कष्ट-बळें ॥
कष्ट-बळें तेज भरा हो शरीरीं ।
कष्टांनीं अंतरीं तेज भरा ॥

भरा अंतर्बाह्य तुम्हीं येणेंपरी ॥
स्वराज्यचि जरी व्हावें देशा ॥

---

## ६ सत्याग्रही यज्ञ

( अभंग )

आमुचा हा माल, आम्ही हा घेणार ।
यासाठीं होणार, तें तें होवो ॥
स्वराज्याचा हक्क, आमुचा हा माल ।
घेण्यासाठीं हाल, सर्व सोसूं ॥
असे निकराचे, सत्याग्रही पुरे ।
ऐक्यें वागणारे, पाहिजेत ॥
ऐसे सत्याग्रही, व्हावे बरेचसे ।
तेव्हां कोठें असे, आशा कांहीं ॥
असा हा बिकट, स्वराज्याचा वाद ।
कष्टाविण दाद, येथें नाहीं ॥
स्वतां मेल्यावीण, स्वर्ग तो दिसेना ।
वचन हें जनां, आहे ठावें ॥
लाखों झिजतील स्वराज्याचे पायीं ।

तेव्हां इष्ट कांहीं, सांपडेल ॥
सोडीव रे देवा, भाकती करुणा ।
परी ही याचना, व्यर्थ व्यर्थ ॥
' देवा दे स्वराज्य, ' मागणें हें फोल ।
जोंवरी न मोल पोंचविलें ॥
हत्ती व्हावा तरी, मोल द्या हत्तीचें ।
येथें मुर्वतीचें, काम नाहीं ॥
काय नाहीं ठावा, देवाचा सिद्धांत ।
पहा गीताग्रंथ, उघडोनी ॥
अनुरुप यज्ञें, तोषवावें देवा ।
तेव्हां इष्ट ठेवा, प्राप्त होय ॥
स्वराज्याचे साठीं, अनुरूप यज्ञ ।
कोणता तो प्राज्ञ, जाणतात ॥
करा करा ऐशा, यज्ञाची तयारी ।
याचनेच्या भरी पडूं नका ॥
सत्याग्रही यज्ञ, स्वराज्याचे साठीं ।
केल्या जगजेठी, धांवेल तो ॥
घेतसे परीक्षा, भक्तांचे सत्त्वाची ।

ही तो श्रीरंगाची, वहिवाट ।
आपुला हा गडी, गोकुळींचा राणा ।
जगतीं या नाना, ढंग करी ॥
स्वराज्याचा माल, याजपाशीं आहे ।
आमुचें हा प , सत्त्व देखा ॥
यासी धरोनिया, हिसकावूं माल ।
हा तो चवचाल, ठाव आम्हां ॥
पांडुरंग म्हणे, जाऊं यज्ञकुंडीं ।
तेव्हांचि हा लंडी, सांपडेल ॥

---

## ७ स्वतंत्रतेची ध्वजा

स्वतंत्रतेची ध्वजा उभारा या तुमच्या नगरीं
तयार व्हा हो उडी घ्यावया सत्याग्रह—समरीं ॥ धृ० ॥
शिवरायाचे तुम्हीं मराठे तुमचा शिवराय ।
प्रतापशाली आहे तुमचा निःसंशय काय ।
वीरपिंड हा तुह्मां लाभला धन्य तुम्हीं धन्य ।
या पिंडानें तुम्हीं जाहलां वीर वीरमान्य ।

मरहट्टे हे ' हट्टें मर ' या ब्रीदा जपणारे ।
हटातटानें झुंज झुंजतां झुंजीं खपणारे ।
शक्तियुक्तिचे युक्तिशक्तिचे खेळ खेळणारे ।
हट्टे मरतिल, हट्टी पार हे कधीं न वळणारे ।
चालः—हे असे जगीं गाजले । शत्रु माजले । जिहीं भाजले ।
ते तुम्हीं वीरपिंडाचे ।
गाजला घनी खंडाचे ।
गाजला भक्त बंडाचे ।
थंड आजला कसे जाहला ? घटना ही न बरी ।
तयार० ॥ १ ॥

थंड आजला कारण याचें मन तुमचें मळलें ।
उदारतेच्या पथावरूनी पद तुमचें ढळलें ।
उदारताविलयानें झाला वीरपिंड थंड ।
वीरपिंडिं या क्षुद्र मत्सरें माजविलें बंड ।
' थोर मी तुम्हीं ' करितां करितां घोर अहंकार ।
थोरांकरवीं पोरपणाचे करवी व्यवहार ।
पक्ष पक्ष ते दक्षपणानें अन्योन्यां छळती ।
चढती पाहुनि अन्योन्यांची क्षुद्रपणें जळती ।

चालः—वैरि हा क्षुद्र मत्सर । जाळिलें घर । जोडितों कर ।

आठवा शिवाजी राजा ।

आठवा तयाच्या काजा ।

या क्षुद्रपणातें लाजा ।

क्षुद्रपणाची थंडपणाची घटना ही न बरी ॥

तयार० ॥ २ ॥

---

## ८ गीताधर्म व सत्याग्रह

स्वस्ति प्रणम्य प्रणिधाय कायम् ।

अभ्यर्थये हन्त सदस्सकृत्वः ॥

श्रद्धामधिष्ठाय विमृश्य शास्त्रम् ।

सत्याग्रहस्य क्रियतां स्वकार्यम् ॥ १ ॥

विमृश्य शास्त्रं श्रद्धां च पुरस्कृत्य मुमक्षुभिः ।

सात्त्विकं कर्म कर्तव्यमिति गीता प्रगायति ॥ २ ॥

शास्त्रेषु गीताशास्त्रं वै कार्याकार्यव्यवस्थितौ ।

प्रमाणमग्रिमं तत्र सर्वधर्मविचारणा ॥ ३॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।

अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥ ४ ॥
इदं मुमुक्षूनुद्दिश्य गीताधर्मस्य गर्जितम् ।
श्रुत्वा सम्यगधीतोऽयं मया धर्मो मुमुक्षुणा ॥ ५ ॥
गीताशास्त्रस्य धर्मेऽत्र सर्वभूतहिते रतिः ।
रहस्यं प्रथमं दृष्टं द्वितीयं लोकसंग्रहः॥ ६ ॥
रहस्यभूतमेतद्वै गीताशास्त्रविधिद्वयम् ।
प्रमाणमग्रिमं कृत्वा वार्तितव्यं मुमुक्षुभिः॥ ७ ॥
यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ ८ ॥
कामोपभोगपरमा आसुरं भावमाश्रिताः ।
प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥९ ॥
परित्राणं च साधूनां विनाशश्चोग्रकर्मणाम् ।
धर्मसंस्थापनं चेति कर्म वै भगवत्प्रियम् ॥ १० ॥
मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तःसंगवर्जितः ।
निर्वैरः सर्वभूतेषु यःस मामेति पांडव ॥ ११ ॥
इत्यत्र भगवत्कर्मत्रितयं क्रियतामिति ।
गीताशास्त्रविधिः स्पष्टो मुमुक्षूणां विमुक्तये ॥ १२ ॥
यदत्र लोके विख्यातमद्य सत्याग्रहव्रतम् ।

तस्यापि परमोद्दिष्टं भगवत्कर्मणां त्रयम् ॥ १३ ॥
विमृश्य शास्त्रं श्रद्धां च पुरस्कृत्य मुमुक्षुभिः ।
सत्याग्रहे वर्तितव्यं भवद्भिः कार्यकारिभिः ॥ १४ ॥
उत्पत्स्यतेऽस्ति लोके वै शास्त्रं सत्याग्रहं प्रति ।
तद्विद्यमानं विज्ञाय कार्यं कर्म समाचरेत् ॥ १५ ॥
श्रद्धया परया कार्यं कृतं सत्याग्रहस्य यत् ।
तदेव धर्मसंमूढान्धर्मे स्थापयितुं क्षमम् ॥ १६ ॥
अश्रद्दधानं स्वजनं मोहपंकात्सुदुस्तरात् ।
उद्धर्तुं सुमहान्यत्नः कार्यः श्रद्धाधनैरिह ॥ १७ ॥
मयात्र विषये दीर्घं सुदीर्घं सुविचारितम् ।
इत्येव कथयन्न् याचे याचितं सुविमृश्यताम् ॥ १८ ॥
सुविमृश्य विधातव्या सत्यसेवा यथारुचि ।
सा भूयात्सर्वलोकस्य सुखाय च शिवाय च ॥ १९ ॥

[ सर्वांचें कल्याण चिंतून व अनंत वेळा साष्टांग प्रणिपात करून माझी सर्वांस अशी प्रार्थना आहे कीं, आपण शास्त्र-चिंतन करून श्रद्धायुक्त अंतःकरणानें आपल्या सत्याग्रहरूपी कर्तव्यकर्माचें आचरण करा. कारण शास्त्राचें चिंतन करून श्रद्धायुक्त अंतःकरणानें प्रत्येक मुमुक्षु माणसानें सात्त्विक कर्म

करावें असे गीता आग्रहपूर्वक सांगते. चांगल्या व वाईट कर्मा-संबंधीं निर्णय देणाऱ्या सर्व शास्त्रांत गीता हें प्रामुख्यानें प्रमाण-भूत शास्त्र आहे. त्यांत सर्व धर्मांचा विचार केला आहे. " सर्व धर्म बाजूला सारून मला शरण ये, मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन, शोक करूं नकोस, " असें गीताधर्म सर्व मुमुक्षूंस गर्जना करून सांगत आहे, आणि मुमुक्षू असा जो मी त्यानें गीताधर्माची ही गर्जना श्रवण करून त्याचें उत्तम तऱ्हेनें अध्ययन केलें आहे.

गीताशास्त्रामध्यें सर्व भूतांच्या कल्याणाचा विचार प्रथम आहे. हें गीतेचें पहिलें रहस्य असून दुसरें रहस्य लोकसंग्रह आहे. हीं दोन गीताधर्माचीं प्रमुख रहस्यें होत व हींच प्रमाण मानून सव मुमुक्षु लोकांनीं आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. जो शास्त्राला सोडून वर्तन करतो व स्वार्थबुद्धीनें कार्याला प्रवृत्त होतो त्याचा इष्ट हेतु साध्य होत नाहीं. त्याला मोक्ष तर नाहींच पण सुख सुद्धां मिळत नाहीं. जे सुखाच्या इच्छेनें व स्वार्थानें आसुरी इच्छेला बळी पडतात ते दुरात्मे जगाच्या अहिताला व स्वतःच्या नाशाला कारणभूत होतात. साधूंचें रक्षण व आततायी पुरुषांचा नाश करून धर्माची संस्थापना करणें हेंच कर्म भगवंताला प्रिय आहे. ' जो माझा भक्त माझें

( आवडतें असें ) कर्म आशा सोडून व सर्व भूतांचे ठायीं निर्वैर भाव ठेवून एकनिष्ठेनें करतो तो मला येऊन मिळतो,' असें भगवंतांचें वचन आहे. याप्रमाणें भगवंताला प्रिय असलेलें व वर वर्णिलेलें जें तीन प्रकारचें कार्य त्याचें प्रत्येक मुमुक्षूनें मुक्तीसाठीं आचरण करावें असा गीतेचा स्पष्ट आदेश आहे.

हल्लीं जगांत विख्यात झालेलें जें सत्याग्रहव्रत त्याचें परम उद्दिष्ट भगवत्प्रणीत जें कर्मत्रय तेंच होय. म्हणून कार्यकारी असे जे आपण मुमुक्षु त्यांनीं शास्त्राचें चिंतन करून व श्रद्धेची नेहमीं कांस धरून या सत्याग्रहव्रताचें आचरण करावें. सत्याग्रहासंबंधींचें शास्त्र कांहीं निर्माण व्हावयाचें आहे व कांहीं प्रचलित आहे. तरी आज जें जगतांत विद्यमान आहे, त्याचें पूर्ण ज्ञान करून घेऊन कर्तव्य कार्य करावें. परम श्रद्धेनें सत्याग्रहव्रताचें आचरण केलें असतां तें धर्मापासून च्युत झालेल्या लोकांस धर्ममार्गावर आणण्यास समर्थ होतें. श्रद्धाहीन अशा स्वजनांचा मोहपंकांतून उद्धार करण्यासांठीं श्रद्धायुक्त लोकांनीं मोठा प्रयत्न केला पाहिजे.

शेवटीं, मीं या विषयासंबंधानें फार दीर्घ काळपर्यंत बारकाईनें विचार केला आहे इतकेंच कळवून असें मागत आहे

कीं, माझ्या याचनांचा नीट विचार करा. नीट विचार करून यथारुचि सत्यसेवा कराल ती सर्वांच्या कल्याणाला व सुखाला कारण होईल.

---

# १ झेंडागीत

महाराष्ट्रझेंडा । वंदुनी । महाराष्ट्रझेंडा
नव्या युगींचा नवीन वंदू हिंदराष्ट्रझेंडा ॥ आमुचा ॥ ध्रु० ॥
स्वतंत्रतेचा विरक्ततेचा महाराष्ट्र झेंडा । भगवा ।
करील विजयी नव्या युगींचा हिंदराष्ट्रझेंडा । आमुचा ॥ १ ॥
हिंदूराष्ट्रझेंडा या नव युगिं नवीन रंगतसे । जनमतें ।
नवीन राष्ट्रीय झेंड्यानें या रिपुमन भंगतसे । आग्रही ॥ २ ॥
नवीन झेंडा लोकशाहिच्या नवीन रंगाचा । पाहुनी ।
दाह होतसे दुःसह निशिदिनिं रिपुच्या अंगाचा ॥ आग्रही ॥ ३ ॥
नव्या लोकशाहीचा झेंडा विजयें फडकावा । भारतीं ।
या ध्येयानें ध्येयरूप हा महाराष्ट्र व्हावा । आमुचा ॥ ४ ॥
शिवप्रभू मावळे वीरवर बाजी प्रभुवीर । विदेही ।
हृदयसंपुटीं वसती अमुच्या पूर्वज रणधीर । कितिक ते ॥ ५ ॥
रक्तीं आमुच्या परंपरेची धर्मयुद्धभक्ति । खेळते ।

हीच भक्ति देशोद्धाराची असे थोर शक्ति । पुण्यमय ॥ ६ ॥
याच भक्तिचा याच शक्तिचा महाराष्ट्र झेंडा । भगवा ।
झाला होता दास्य-विमोचक या भारत खंडा । आमुच्या ॥ ७ ॥
स्वतंत्रतेचे लोकशाहिचे मिळू सर्व भक्त । चला या ।
नवीन राष्ट्रिय झेंड्यासाठीं आटवुं या रक्त ॥ आपुलें ॥ ८ ॥
स्वतंत्रतेचे लोकशाहिचे मिळू सर्व भक्त । चला या ।
नवीन राष्ट्रिय झेंड्यासाठीं वाहवुं या रक्त ॥ आपुलें ॥ ९ ॥
धर्मयुद्धमंत्रें हटवीलें स्वजनमोह-बंडा । अर्जुनीं ।
हरिमंत्रें त्या होइल विजयी हिंदराष्ट्रझेंडा ॥ १० ॥

---

## १० झेंडागीत

बंद्यांत वंद्य आम्हां । नवहिंदराष्ट्रझेंडा ॥ ध्रु० ॥
रमवीत हा जनाला । जमवीत वीरमाला ।
शमवील शत्रुबंडा ॥ नव ॥ १ ॥
भगिनींस बंधुंना ही । विनती न फार कांहीं ।
हृदयांत एक मांडा ॥ नव ॥ २ ॥
प्यारे मुमुक्षु भाई । विनती तुम्हां सदा ही ।
हृदयांतुनी न सांडा ॥ नव ॥ ३ ॥

१९५०

दडपूनी हा अहंता । नेईल मोक्ष-पंथा
तुडवील मोहबंडा ॥ नव ॥ ४ ॥

स्वातंत्र्य-मोक्ष-दाता । सायुज्य-मोक्ष-दाता ।
जगिं हाचि एक गुंडा ॥ नव ॥ ५ ॥

सत्याग्रहप्रकारीं । सेवूनि निर्विकारीं ।
करुं वंद्य सर्व खंडां ॥ नव ॥ ६ ॥

रण शांतियुक्त खेळूं । रण शुद्ध मुक्त खेळूं ।
करुं वंद्य सर्व खंडां ॥ नव ॥ ७ ॥

कारागृहांत राहूं । यमधर्मभेटि घेऊं ।
करुं वंद्य सर्व खंडां ॥ नव ॥ ८ ॥

मिळवूनि भाइ भाई । जुळवूनि लोकशाही ।
करुं वंद्य सर्व खंडां ॥ नव ॥ ९

रमवील हा जनाला । जमवंत वीरमाला
शमवील शत्रुबंडा ॥ नव ॥ १५ ॥

---

## ११ शिस्तगीत

थोरांत थोर सकलां । तो एक शिस्तधर्म ॥ धृ० ॥
आम्हांसि पूर्वकालीं । करुनी महत्त्वशाली ।

जो देइ आर्यनाम ॥ तो एक ॥ २ ॥
आर्यत्व शिस्तधर्म । शिष्टत्व शिस्तधर्म
आर्यत्व-हृदयमर्म ॥ तो एक ॥ २ ॥
करि तोचि राष्ट्रपाया । धरि तोचि राष्ट्र ढाया ।
करि तारकत्वकर्म ॥ तो एक ॥ ३ ॥
जी शिस्त तीच शाही । शिस्तींत राज्य राही ।
राष्ट्रेतिहासवर्म । तो एक ॥ ४ ॥
ऋषिवंद्य कृष्ण राम । सुजनांसि सौख्यधाम ।
त्यांचाहि थोर धर्म ॥ तो एक ॥ ५ ॥
आम्हांत कृष्ण व्हावा । आम्हांत राम यावा
म्हणुनी करूं स्वधर्म ॥ तो एक ॥ ६ ॥
आम्हां स्वराज्य व्हावें । नव लोकराज्य व्हावें
म्हणुनि करूं स्वधर्म ॥ तो एक ॥ ७ ॥

---

# १२ शिस्तगीत

शिस्त पूजिली सदा सर्व जगीं सर्व शास्त्रकारीं
पुजूं नित्य ही } शिस्तदेवता शिस्तीच्या हारीं ॥ धृ० ॥
पूजूं भक्तिनें

प्रपंचशास्त्रीं थोर आजला बंधु गौरकाय
त्यांचा पडतो कसा प्रपंचीं एक एक पाय ॥
शिस्त शिस्त या तालावरतीं पाय पहा पडतो
शिस्तनिं या गौरकाय हा कुठें कुठें चढतो ॥
परवां परवां मागें असतां किती पुढें चढले
किती तयांच्या मागें अमुचे लोक आज पडले ॥
हें चढणें हें पडणें याला मूळ एक शिस्त
शिस्तयुक्त ते चढले पडलों आम्हीं बेशिस्त ॥
शिस्त ही राष्ट्रकारक । राष्ट्रधारक । राष्ट्रतारक
शिस्त ही चीज बिनमोल
शिस्तहीन झालों फोल
शिस्त ही रुजो मनिं खोल
शिस्त मनीं रुजवूं या राष्ट्रिय सद्विद्यागारीं । राष्ट्रिय सत्कार्यागारी ।। पुंज ॥ १॥

पहा पहा ही शिस्तदेवता बाजीप्रभुमूर्ति
पहा पहा ही तानाजीची दिव्य शिस्तमूर्ति ॥
प्रिय पुत्राचा लग्नसोहळा उद्यां आज गेली ॥
शिस्तमूर्ति कोंडाण्यावरि ती यमधर्मे नेली ॥

शंगण्यास राष्ट्रात्मा शिवचा जावा सुखरूप ॥
शिस्तदेवता यास्तव झाली खिंडित शिवरूप ॥
राष्ट्र मराठा झालें ठरलें तरलें ती शिस्त॥
राष्ट्र मराठा हरलें सरलें सरली ती शिस्त ॥
शिस्त ही राष्ट्रकारक । राष्ट्रधारक । राष्ट्रतारक

शिस्त ही चीज बिनमोल
शिस्तहीन झालो फोल
शिस्त ही रुजो मनिं खोल

शिस्त मनीं रुजवूं या राष्ट्रिय सद्विद्यागारीं । राष्ट्रिय
सत्कार्यागारीं ॥ पुजूं० ॥

परमार्थाचें शास्त्र आमुचें थोर सर्व काल ।
अज्ञ जनांच्या हातीं होतीं त्याचे ही हाल ॥
असो पहा परमार्थशास्त्र हें अमुचें इतरांचें ।
परमार्थी या पहा श्रेष्ठतर शासन कोणाचें
परमार्थी या शिस्त शिस्त हा ताल सदा वाजे
शिस्तीचे या शासन येथे श्रेष्ठश्रेष्ठ गाजे ॥
शिस्त इंद्रिया शिस्त मनाला बुद्धीला शिस्त ।
शिस्तयुक्त जे मोक्षा चढती पडती बेशिस्त ॥

वा. क्र. ९

शिस्त ही देहतारक । मनोधारक । मोक्षकारक
शिस्त ही चीज बिनमोल ॥३॥
स्वराज्य व्हावें लोकशाहिचें व्हावें स्वाराज्य ।
अधर्म बुडुनी वाढावें या जगीं धर्मराज्य ।
हिंदराष्ट्र हें सत्वर व्हावें खरें खरें राष्ट्र ।
राष्ट्रीकरणीं पुढें असावा थोर महाराष्ट्र ॥
मनीं वांछितों गोड गोष्टि या सर्व जविभावें ।
मनोराज्य हें जनीं कशानें मूर्तरूप व्हावें ॥
मूर्तरूप या मनोरथांना देत एक शिस्त ।
शिस्तयुक्त ते कृतार्थ होती झुरती बेशिस्त ॥
शिस्त ही राष्ट्रकारक । धर्मधारक । जीवतारक ।
शिस्त ही चीज बिनमोल ॥४॥

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

खरा धर्म देशार्थ हा जीव द्यावा
खरा धर्म विश्वार्थ हा जीव द्यावा
खरा धर्म दुष्टासि दुर्दंड द्यावा
खरा धर्म नेई जना मोक्षगांवा

REFBK-0019502
REFBK-0019502